

# आस्वाद बहुरंगी साहित्याचा

शैलजा देशमुख



वि. स. खांडेकर, पु. ल. देशपांडे, साने गुरुजी, आचार्य प्रल्हाद केशव अत्रे , गो . नी . दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर, शांताबाई शेळके, अनिल अवचट ह्या साहित्यिकांनी आपापल्या खास शैलीत वेगवेगळ्या प्रकारांचे खूप सारे गद्य लेखन केले आहे. ह्या आठ साहित्यिकांच्या विपुल साहित्याचा रसाळ मागोवा ह्या पुस्तकात घेतलेला आहे.

ह्या आठ साहित्यिकांनी हे जे वैविध्यपूर्ण लेखन केले आहे, त्यातून विविध वाङ्मयप्रकारांची ओळख होते, समाजाचे दर्शन घडते, माणूस समजतो, निसर्ग उलगडत जातो. त्या साऱ्या पुस्तकांचा नि लेखकांचा परिचय कुमार वाचकांना व्हायला हवा, ह्या उद्देशाने हे पुस्तक लिहिलेले आहे.

प्रत्येक लेखकाची विशिष्ट अशी वृत्ती किंवा स्वभाव असतो. त्याची लेखनामागची प्रेरणा काय आहे? त्याची भाषाशैली, लेखनशैली, मांडणी कशी आहे? त्या लेखकाचा दृष्टिकोन काय आहे? लेखनासाठी त्या लेखकाने कोणते परिश्रम घेतले? विषयाचा कसा अभ्यास केला? या प्रश्नांचा शोध लेखिकेने घेतला आहे, खास अशी निरीक्षणे मार्मिकपणे नोंदवली आहेत. हे सारे कुमार वाचकांसाठी वेचून द्यायचे आहे, कुमारांच्या ग्रहणशक्तीनुसार पुस्तकाची भाषा असायला हवी, याचे भान लेखिकेने ठेवले आहे.

हे पुस्तक वाचून कुमारांना ह्या आठ लेखकांसह इतरही लेखकांची पुस्तके मुळातून वाचण्याची प्रेरणा मिळाली तर...? तसेच काही कुमारांना लेखनाचीही प्रेरणा मिळाली तर...?

खरंच! तेच तर आपल्याला हवे आहे.

**– आश्लेषा महाजन**

**ललित लेखसंग्रह**

छात्र प्रबोधन प्रकाशन, पुणे

किंमत ₹ १२०

jpprakashane.org या संकेतस्थळावर उपलब्ध

# आस्वाद बहुरंगी साहित्याचा

(८ साहित्यिकांच्या साहित्यकृतींचा रसग्रहणात्मक परिचय)

लेखिका

शैलजा देशमुख

छात्र प्रबोधन

ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०

♦ **आस्वाद बहुरंगी साहित्याचा**
(१९९७ ते २०२३ या कालावधीत ‘छात्र प्रबोधन’ मासिकात प्रकाशित झालेल्या साहित्यिकांच्या साहित्याच्या रसास्वादात्मक लेखांवर संपादन करून तयार केलेले पुस्तक!)

♦ **प्रकाशक व मुद्रक**
प्रा. महेन्द्र सेठिया
संपादक, ‘‘छात्र प्रबोधन’,
ज्ञान प्रबोधिनी, पुणे 411030 ☎ (020) 24207 174/175
**email - chhatraprabodhan@jnanaprabodhini.org**

♦ **लेखिका**
शैलजा देशमुख
सी - १०२, पाटे संस्कृती,
सहकारनगर क्र. २, पुणे - ०९ मोबाइल - ९४२२६७१५६९
**email - sgdeshmukh50@gmail.com**

♦ © स्वामित्व प्रकाशकाच्या स्वाधीन

♦ **अक्षरजुळणी व सजावट**
छात्र प्रबोधन,
ज्ञान प्रबोधिनी, पुणे

♦ **मुखपृष्ठ व मांडणी –** रोहित कोकीळ

♦ **आतील व्यक्तिचित्रे –** अर्जुन सूर्यवंशी

♦ **वितरण**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०
ऑनलाइन खरेदीसाठी **jpprakashane.org**

♦ **प्रथम आवृत्ती :** राष्ट्रीय सौर माघ, शके १९४४, फेब्रुवारी २०२३

♦ **किंमत**
₹ १२०/-

**'*Aaswad Bahurangi Sahityacha*'**
**(Collection of pre-published and edited narrative articles appreciating literature of 8 eminent Marathi authors from Chhatra Prabodhan magazine.)**

# प्रस्तावना

मित्रमैत्रिणींनो, तुम्हाला खूप मित्रमैत्रिणी असतील! तरीही तुम्ही एक काम कराल? तुम्ही या वयात पुस्तकांशी मैत्री जरूर करा! हे पुस्तकरूपी मित्र तुम्हाला कधीही एकटेपण जाणवून देणार नाहीत! तुम्हाला अखंड सोबत करतील! यासाठी शैलजाताई तुमच्यासाठी 'आस्वाद बहुरंगी साहित्याचा' हे पुस्तक लिहून तुम्हाला काही महत्त्वाच्या साहित्यिकांचा परिचय घडवत आहेत.

या पुस्तकातील आठ नामवंत साहित्यिकांनी खूप वेगवेगळ्या प्रकारचे लेखन विपुल प्रमाणात केले आहे. त्यामुळे खरे तर त्यांच्याविषयी थोडक्यात लिहिणे, हे कठीण काम आहे; पण शैलजाताईंनी हे काम सहजपणे केले आहे. यात त्यांनी निवडलेल्या लेखकांच्या साहित्यातील विविधता आणि वैशिष्ट्यपूर्णता यांचा नेमका परिचय मार्मिकपणे करून दिला आहे.

**वि. स. खांडेकर** यांच्या रूपककथा, कविता, ललितलेख वाचत तुम्ही यांच्या लेखनशैलीशी परिचित व्हाल. पुढे त्यांच्या कादंबऱ्या तुम्हाला खुणावू लागतील. त्यांच्या भाषेतला ओलावा तुम्हाला संवेदनशील व्हायला मदत करील आणि त्यातील विचारधन तुमच्या मनाला जागृत ठेवील.

'अष्टपैलू' हे रूढ विशेषण अपुरे पडावे, अशा आगळ्यावेगळ्या व्यक्तिमत्त्वाचे साहित्यिक होते, **आचार्य अत्रे**! त्यांनी पत्रकारिता, विनोद, विडंबने, नाटके आदी विपुल साहित्य लिहिले. त्यांचे मराठी भाषेवरील प्रेम उत्कट होते. 'ठेच लागली की, जो आई गं म्हणतो, तो मराठी माणूस', ही त्यांची व्याख्या तुम्हाला भाषा आणि संस्कृती यांचे नाते लक्षात आणून देईल.

**सानेगुरुजी** हे मातृहृदयी होते. त्यांचे 'श्यामची आई' हे पुस्तक तुम्ही वाचले असेलच! त्यांचे इतरही बालवाङ्मय तुम्ही वाचायला हवे! त्यांच्या कविता, त्यांचे अनुवादित साहित्य हेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे. त्यांचे साहित्य वाचताना तुम्हाला कळेल की, सामाजिक कार्य करताना करुणा आणि कणखरपणा दोन्हींची गरज असते!

**गो. नी. दांडेकर** यांचे लेखन तुम्हाला वेगळ्या जगात नेईल. त्या लेखनातील प्रादेशिक चित्रण, बोली भाषा, ठसठशीत व्यक्तिरेखा आणि जगण्यातील उत्स्फूर्तता विलक्षण प्रभावी आहे. 'सृष्टीची लिपी वाचताना मी स्फटिकवंत झालो,' हे त्यांचे शब्द किती सुंदर आहेत! त्यांचे लेखन आणि छंदही तुम्हाला

प्रेरणा देत राहतील. इतिहासाशी तुमचे नाते जोडून देतील.

**पु. ल. देशपांडे** यांची व्यक्तिचित्रं, विनोद वाचताना तुम्हाला भाषेची सहजता, अर्थपूर्णता आणि लवचिकता जाणवेल. साहित्यातली संदर्भसंपन्नताही जाणवेल. हे सगळं अनुभवण्याचा खोल संस्कार तुमच्यातली रसिकता टवटवीत ठेवायला मदत करील. तुम्हाला सौंदर्यदृष्टी लाभेल. ती एक फार मोठी शक्ती असते!

यात कवयित्री **शांता शेळके** यांनी गद्यलेखनही भरपूर प्रमाणात केले आहे. ते त्यांच्या प्रासादिक शैलीमुळे वाचनीय तर आहेच, शिवाय मनात घर करून राहणारेही आहे! त्यांनी रेखाटलेली व्यक्तिचित्रे, त्यांचे अनुवाद, रसास्वाद जरूर वाचा. त्यांच्या ललित लेखनातून तुम्हाला मानवी मनाची नाना रूपे लक्षात येतील, जीवनाची जाण यायला मदत होईल!

**व्यंकटेश माडगूळकर** यांचे लेखन तुम्हाला ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवील! त्यांच्या ‘माणदेशी माणसे’, ‘बनगरवाडी’ आदी गाजलेल्या पुस्तकांचा यात परिचय आला आहेच, शिवाय त्यांच्या ‘अशी माणसे, अशी साहसे’ या दुर्लक्षित पुस्तकाचाही यात सविस्तर परिचय करून दिला आहे. ते पुस्तकही महत्त्वाचे आहे.

**अनिल अवचट** यांच्या सर्वच लेखनामध्ये कुतूहल असते, समाजाविषयी खोल आस्था असते! त्यांनी पत्रकार म्हणूनही लेखन केले आहे. पांढरपेशा जगापलीकडची अनेक माणसे जाणून घेतली आहेत. त्यामुळे त्यांचे लेखन वाचताना तुम्ही प्रभावित व्हाल! तुमच्या मनात सामाजिक भान जागे होईल. विविध छंदांमध्ये रमणारे त्यांचे वल्लीपण तुम्हाला आकर्षित करील, त्याचवेळी स्वत:साठी छंदाची पाऊलवाट शोधण्याची प्रेरणाही तुम्हाला देईल!

या पुस्तकातल्या काही जागा फार मार्मिक आहेत. खांडेकर यांचे लघुनिबंध म्हणजे मर्यादित अर्थाने मराठी गद्यातील भावगीतच! हे यातले विधान लक्षात राहते. शैलजाताईंनी पु. ल. देशपांडे यांच्यावरील लेखाची सुरुवात पद्माकर गोवईकर यांच्या पत्राने केली आहे, ती आकर्षक झाली आहे. यातल्या लेखांची शीर्षके नेमकी आणि बोलकी आहेत! एकंदरीत हे पुस्तक वाचताना तुम्ही रंगून जाल, तुम्हाला प्रेरणेचे पंख फुटतील आणि झेप घ्यायला नव्या दिशाही सापडतील! तुमच्या वाचन प्रवासाला माझ्या खूप खूप शुभेच्छा आहेत!

**– डॉ. नीलिमा गुंडी**

# अनुक्रमणिका


❖ प्रस्तावना – डॉ. नीलिमा गुंडी ३

❖ मनोगत – शैलजा देशमुख ५

१. जीवनवादी साहित्यिक
**वि. स. खांडेकर** ९

२. जीवनाची ओढ असणारा यात्रेकरू
**आचार्य अत्रे** १८

३. सत्य–शिव–सौंदर्याचे उपासक
**साने गुरुजी** २९

४. देवाची लिपी वाचणारे अनुभवसंपन्न लेखक
**गो. नी. दांडेकर** ३९

५. एक आनंदाचे झाड
**पु. ल. देशपांडे** ४८

६. शब्दांशी रेशीम नाते जडलेली लेखिका
**शांता शेळके** ६१

७. ग्रामीण जीवनाचे अस्सल चित्रण
**व्यंकटेश माडगूळकर** ७४

८. एका अवलियाचे आविष्कार
**अनिल अवचट** ८५